**सहाय्यक जिल्हाधिकारी, तळोदा भाग तळोदा यांचे कडून**

---

**भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 अंतर्गत कलम क्र. 11 ची अधिसूचना-**

क्रमांक भुसंपादन मौजे डनेल ता. अक्कलकुवा जि.नंदुरबार/ एस.आर.नं. 01/2019 दि.6/02/2019

ज्याअर्थी,भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013 (2013 चा 30) (ज्याचा उल्लेख पुढे उक्त अधिनियम असा करण्यात आहे आहे) च्या कलम 3 च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण 11/2014/प्र.क्र.77/अ-2/दिनांक 19 जानेवारी 2015 (यांत यापुढे जिचा निर्देश उक्त् अधिसुचना असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्हयांतील 500 हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमिन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल, आणि

ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समूचित शासन असलेल्या सहाय्यक जिल्हाधिकारी तळोदा भाग तळोदा यांना या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमिन (यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे)आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते (ज्याच्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे)आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (1) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीचे उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासल्याची शक्यता आहे, आणि

ज्याअर्थी,उक्त अधिनियमाच्या कलम 43 च्या पोट कलम (1) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी प्रशासक नेमण्याची तरतुद आहे. परंतु सदर प्रकल्पात विस्थापन नाही तसा तपशील या सोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये

Scanned by CamScanner

दिलेला आहे. कलम 4 अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त गट क्रमांकच्या अथवा त्याच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीत कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रर्वतनातून सूट देता येईल.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (5) अ नुसार जिल्हाधिकारी भुमिसंपादन, पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम 2014 (यांत यापुढे त्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आली आहे)यांच्या नियम 10 च्या उपनियम (3) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भुमिअभिलेखाच्या अदयावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करीत आहेत.

सदर अधिसूचनेबाबत ज्या हिसंबंधित व्यक्तीस आपल्या लेखी हरकती नोंदवावयाच्या आहेत त्या अधिसुचनेच्या प्रसिध्दी दिनांकापासुन 60 दिवसाच्या आंत सहाय्यक जिल्हाधिकारी तळोदा भाग तळोदा यांच्या कार्यालयात नोंदवाव्यात.

उक्त जमिनीचे नकाशे सहाय्यक जिल्हाधिकारी तळोदा भाग तळोदा यांच्या कार्यालयात वेळेत पाहणे करीता उपलब्ध आहेत.

**अनुसूची- एक**

**जमिनीचे वर्णन**

मौजे डनेल ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार

| अ.क्र. | गट नंबर | संपादीत करावयाचे क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| | मौजे डनेल ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार | |
| 1 | 167/ 1अ | 0.59 |
| 2 | 167/ 1ब | 0.59 |
| 3 | 167/ 1क | 0.60 |
| | एकूण क्षेत्र | 1.78 |

Scanned by CamScanner

**संपादनाचे प्रयोजन**:- सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत बुडीतात जाणा-या जमिनीचे भुसंपादन.

**अनुसूची- दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत वितरण**

**प्रकल्पाचे नांव:-** सरदार सरोवर प्रकल्प

**प्रकल्पांचे वर्णन:-** सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत बुडीतात जाणा-या जमिनीचे भुसंपादन

**समाजाला मिळणारे लाभ :-** (या प्रकल्पामुळे सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत 27% महाराष्ट्रासाठी विज पुरवठा करणार आहे. )

अ) या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणी पुरवठा, उद्योग धंदयांना पाणी पुरवठा व विज उत्पादन होणार आहे. त्याच बरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भुमिहीन शेतमजूर याच्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे.

**अनुसूची- तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे-** विस्थापन नाही.

**अनुसूची चार**

**सामाजिक परीणाम निर्धारणाचा सारांश** :- नवीन भुसंपादन कायदा 2013 चा कलम (6) मध्ये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट आहे.

**अनुसूची पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल** :- लागु नाही.

दिनांक:- 06/2/2020

ठिकाण:- तळोदा

सहाय्यक जिल्हाधिकारी * तळोदा भाग तळोदा *

**अविशांत पंडा** (भा.प्र.से)

सहाय्यक जिल्हाधिकारी,

तळोदा भाग तळोदा.

Scanned by CamScanner